# "यांचेशिवाय नमस्कार तो कोणाला करायचा ?"

सर्वप्रथम 'संपर्क' या, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने चालविलेल्या त्रैमासिकाचे संपादक **श्री. प्रभाकर कोनकर** यांचे मी अभिनंदन करतो. डोंबिवलीमध्ये दोन महिन्यांपूर्वी त्यांची भेट झाली असतां 'संपर्क'साठी सातत्याने मी लिहावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आमची www.thekarhaadaa.org ही वेबसाईट ते नेहमीच वाचतात. डोंबिवली कऱ्हाडे ब्राह्मण संघाने त्याकरिता यावर्षी आमचा सत्कारही केला. वेबसाईटवरचे सर्व लिखाण इंग्लिश भाषेतून असल्यामुळे, बहुसंख्येने असलेल्या मराठीच्या जाणकारांसाठी हे लिखाण मराठीतून हवे हा त्यांचा आग्रह रास्तच आहे. त्यांच्या इच्छेला मान द्यावा असे वाटले.

आपण कऱ्हाडे, घरातील माणसांना थोडा वेळ बाजूला ठेवूनही एखाद्या घराबाहेरच्या व्यक्तीला फायद्याचे ठरणारे वर्तन करीत असतो. 'स्वार्थ बाजूला सारून दुसऱ्याच्या हिताचा विचार प्रथम करणाऱ्यांना भर्तृहरीने 'सत्पुरुष' म्हटले आहे. नेमका हा आपला सद्गुण, व्यवहारात आपल्या खऱ्या गुणवानांना दूर लोटून, त्या गुणांचे नाटक करणाऱ्यांना प्रसिद्धी मिळवून देतो. श्री. कोनकरांनी या आपल्या वंशदत्त स्वभावाला थोडी मुरड घातली आणि एका कऱ्हाडा व्यक्तीला वाव द्यायचे ठरविले.

संख्येने अत्यंत कमी असूनही ज्या वंशदत्त गुणांमुळे हा कऱ्हाडा, उद्या आपल्या लोकांना भारी ठरेल या विचारांनी, वर्तमान काळात त्रस्त झालेल्या लोकांची अशा लोकांना वेळीच खुडून टाकण्याची मानसिकता किंवा दुष्ट बुद्धी अनुभविल्यावर तर अशा वंशदत्त गुणांचा अभ्यास व जोपासना व्हायला हवी, असे मला प्रकर्षाने वाटते. निदान या सद्गुणी लोकांचे दुर्लभ असे स्मरण तरी करायला हरकत नाही.

या लेखमालेमधून ज्या गुणांचा परंपरेने आपल्याकडे वारसा चालत आलेला आहे; ज्या गुणांमुळे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्येही आमच्या लोकांनी आपले अढळ स्थान कायम राखले, असे उदात्त गुण आपण समजून घ्यावेत या उद्देशाने, अशा गुणवान कऱ्हाडा व्यक्तिमत्त्वांची ओळख आपण करून घेऊ. या लेखमालेमधून, अभिनिवेश-विरहित, सरळ, स्वच्छ व सत्य माहिती आपल्या लोकांच्या गुणवैशिष्ट्यांसह समजून घेऊ. त्यामुळे कोणते गुण आपणाला वंशदायामुळे मिळालेले आहेत आणि कोणते गुण नित्य-नवीन गतिमान अशा परिस्थितीमुळे आपण मिळविले आहेत ते समजून घ्यायला मदत होईल. व्यक्तीचे सद्गुण, ही व्यक्तीची उघड न झालेली संपत्ती असते. तिला जाणत्या लोकांनी राखायचे असते, त्यांची मशागत करायची असते.

सतत पंधरा वर्षे मुंबईच्या महाराष्ट्र विधानसभेचे आमदार म्हणून राहिलेल्या आणि आज वयाच्या शंभरीजवळ आलेल्या, संगमेश्वर तालुक्यातल्या देवळे या गावी राहणाऱ्या **श्री. शशिशेखर काशिनाथ आठल्ये** या आदरणीय व श्रेष्ठ अशा समाजसेवकाची अनोखी ओळख आज करून घेऊ.

श्री. आठल्ये गुरुजींचा आमदारकीचा वेष अत्यंत साधा होता. एक खाकी चड्डी, खाकी शर्ट व एक टोपी. एकदा आठल्ये गुरुजी मुंबईमधे, परळच्या एस्.टी. स्टँडवर कोकणात जाणाऱ्या गाडीच्या प्रतिक्षेत उभे असताना, एका प्रवाशाने, त्यांना एस्.टी.च्या टपावर सामान चढविणारी व्यक्ती समजून आपले सामान गाडीवर चढवायला सांगितले. त्याचे काम झाल्यावर, केलेल्या कामाचा

मेहनताना गुरुजी घेत नव्हते म्हणून प्रवासी रागावला. वाद झाला. हे दुरून पाहणाऱ्या एका प्रवाशाने आठल्ये गुरुजींकडे धाव घेतली; व त्या प्रवाशाला मारायचे फक्त बाकी ठेवले. गुरुजींनी त्याची समजूत काढली; लोकांना त्यांच्या अडचणीत मदत करणारा अशी लोकप्रतिनिधीची ओळख आहे. मग, त्या प्रवाशाला मी थोडी मदत केली तर बिघडले कोठे ? असे म्हणाले.

आठल्ये गुरुजी ! कोणत्याही काळातल्या कोणत्याही देशातल्या लोक-प्रतिनिधींचे आपण गुणश्रेष्ठ आदर्श आहात. तुम्हाला शतशः नमस्कार !!

**अवधूत हर्डीकर**
१६ए, गणेशकृपा सोसायटी,
परमहंसनगर, पौड रोड,
पुणे ४११०३८